**Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):02**
**ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU**
**International open-access peer-reviewed refereed monthly journal**
**https://knowledgeableresearch.com/index.php/1**

# साहित्यातील मानवी मूल्ये आणि कृत्रिम बुद्धिमत्ता

जयश्री गायकवाड*

संशोधक

**शोध सार**

*आजचे जग हे अतिशय गुंतागुंतीचे आणि व्यामिश्र स्वरूपात झालेले आहे. माणसाला माणसाविषयी आत्महत्या, प्रेम आणि जिव्हाळा राहिला नाही. यांत्रिक पद्धतीने लोक जगत आहेत. प्राचीन काळी व मध्ययुगीन काळी एकमेकाला जीव लावणारी माणसं आज एकमेकांच्या जीवावर उठलेली आहेत. मानवी मूल्य आहेत की नाहीत? हा मोठा प्रश्न आपल्यासमोर निर्माण झाला आहे. अशा काळात संगणक, मोबाईल आणि एआय अधिक वापर अधिकाधिक कृत्रिम नातेसंबंध निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत मानवी मूल्ये आणि कृत्रिम बुद्धिमत्ता याचा विचार करणे गरजेचे आहे.*

**बीज शब्द:** *मानवी मूल्ये, कृत्रिम बुद्धिमत्ता, साहित्य, मराठी साहित्य*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
जयश्री गायकवाड
**Email:** Jayashreetapaskar@gmail.com

## संशोधन विषयाचे महत्त्व:-

आज आपण मोठ्या प्रमाणामध्ये सर्वत्र यायचा वापर करीत आहोत. कथा, कविता आणि पत्र सुद्धा एआय च्या मदतीने विद्यार्थी मोठ्या प्रमाणात त्याचा वापर करीत आहेत. अशा काळात या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून मानवी मुल्ये रुजवता येतील का?हा फार मोठा प्रश्न आहे. आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेला नाकारून चालत नाही पण मानवी मुल्येही तेवढेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे या दोन विषयाचा सांगड घालून त्यास दिशा देणं हा अतिशय महत्त्वाचा आहे. म्हणून हा विषय संशोधनासाठी उपयुक्त ठरेल असे मला वाटते.

## विषय निवडी मागील भूमिका:-

माझं संशोधन 'वारकरी संतांच्या काव्यातील मानवी मूल्यांचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर सुप्रसिद्ध व्यक्तिमत्त्व तज्ज्ञ डॉ. हनुमंत भोपाळे यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. या विषयावर संशोधन करताना मला आज मोठ्या प्रमाणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होताना दिसते आहे.अशावेळी संतांच्या काव्यातील मानवी मूल्ये आणि आजची कृत्रिम बुद्धिमत्ता याचा काही समन्वय साधता येईल का? असा प्रश्न मला पडला.यातून मी 'साहित्यातील मानवी मूल्ये आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ' हा विषय निवडला.

## गृहीतके :-

माझ्या संशोधन पेपर करिता मी खालील गृहीतके मांडली आहेत.

१) मानवी मूल्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा सहसंबंध समजून घेणे.

२) साहित्यात संशोधन, इ लायब्ररी, ऑडिओ बुक इत्यादी साहित्य उपक्रमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करता येईल याचा शोध घेणे.

३) साहित्यात वाचन चळवळ साहित्य चळवळ वृद्धिंगत करण्यास तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल याचा शोध घेणे.

४) कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण होणाऱ्या संधी आणि धोके आव्हाने यांचा अभ्यास करणे.

५) कृत्रिम बुद्धिमत्तेचा समाज मनावर सकारात्मक व नकारात्मक कसा परिणाम होतो याचा अभ्यास करणे.

## शोधनिबंधाची वैशिष्ट्ये -

१) सामाजिक मूल्य सामूहिक असतात.

२) मूल्य हे सामाजिक मानक आहे.

३) मूल्याच्या संदर्भात समाजात एक मत दिसून येतो.

४) मानवी मूल्य हे भावनेशी संबंधित असतात.

५) सामाजिक मूल्यात विविधता दिसून येते.

६) मूल्य हे सामाजिक कल्याण आणि सामाजिक गरजांसाठी महत्वपूर्ण मानल्या.

७) मूल्य हे गतिशील असतात.

ही वैशिष्ट्ये या विषयासंदर्भात आहेत.

**संशोधन पद्धती:-**

संशोधन पेपर लिहीत असताना मी तौलनिक आणि ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. मध्ययुगीन काळातील संताच्या काव्यातील मूल्ये आणि अलीकडील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून शोध घातलेला विचार याचा जसा तौलनिक विचार येथे अपेक्षित आहे तसेच मध्ययुगीन काळ, प्राचीन काळ आणि आजचा काळ..या  काळाच्या पातळीवर होत जाणारा बदल हाही एक ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर प्रस्तुत निबंधातून करण्यात आलेला आहे.

**संशोधन स्वरूप व व्याप्ती.:-**

प्रस्तुत शोध निबंधात मानवी मूल्यांचा व कृत्रिम बुद्धिमत्तेचा विचार करण्यात आला आहे. सतत विकसित होणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात, मानवी मनाला एक प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. जर आपण बुद्धिमान यंत्रासह अस्तित्वाकडे वाटचाल करत असो, तर याचा मानवी मूल्यावर काय परिणाम होईल. या गोष्टीचा विचार करण्याआधी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? आणि मानवी मूल्यांची व्याख्या स्पष्ट करणे गरजेचे आहे आपल्याला ज्ञात आहे की,कृत्रिम बुद्धिमत्ता संगणक विज्ञानातील एक आत्या आधुनिक तंत्रज्ञान आहे. ज्याद्वारे संगणक हे मानवी भाषा लिहिण्याची व वाचण्याची व समजून घेण्याची मोठ्या प्रमाणात माहिती गोळा साधन आहे . आणि विश्लेषणावर आधारित सूचना देण्याची क्षमता प्राप्त करत असते .तेव्हा आपण त्याला कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणतो. मूल्य म्हणजे काय? याचा विचार करूया मूल्य शब्दाची व्याख्या करणे कठीण असले तरी तो विविध अर्थाने वापरला गेला आहे, आपण असे म्हणू शकतो की, तो मानवी गुण व इच्छा पूर्ण करणारा त्यात गुण दर्शवतो. मानवी मूल्य म्हणजे अशी नैतिक व सामाजिक तत्वे जी मानवाच्या विचाराला आणि निर्णयाला योग्य दिशा देतात . मानवी मूल्य ही आदर्श तत्वे आहेत त्या आधारे माणूस योग्य-अयोग्य चांगले वाईट यामधील फरक ओळखतो.

मानवी मूल्य म्हणजे असे आदर्श किंवा गुण जे मनुष्याच्या जीवनाला अर्थ देतात. आणि मनुष्याला चांगले जीवन जगण्यास मार्गदर्शन करतात ही मूल्य व्यक्तीच्या विचारांवर वर्तनावर आणि समाजावर परिणाम करतात. मानवी मूल्य म्हणजे नैतिक, सामाजिक, अध्यात्मिक व वैयक्तिक तत्त्वांचा समुच्चय आहे, जो व्यक्तीच्या विचारात, वागणूक येत व तसेच जीवनशैलीत प्रकट होतो. ही मूल्य व्यक्ती पुरते मर्यादित न राहता समाजासाठी ही महत्त्वाची ठरतात.

**मूल्याची व्याख्या** –

**१) डॉ. राधा कमल मुखर्जी (R.K. mukerjee)**

"मूल्ये ही समाजा द्वारा मान्यताप्राप्त इच्छा आणि उद्दिष्टे होते, ज्यांचे अंतरीकरण हे शिकणे अथवा सामाजिक करण्याच्या प्रक्रियेच्या माध्यमातून होते आणि जे आत्मनिष्ठ अधिमान्यता, मानक आणि अपेक्षा बनतात.

**२) हॅरी जॉन्सन -(H.M. jonson)**

मूल्यांची एक संकल्पना अथवा मानकाच्या रूपात व्याख्या केली जाऊ शकते, जे सांस्कृतिक किंवा व्यक्तिगत असू शकते आणि ज्याद्वारे वस्तूची एक- दुसऱ्या सोबत तुलना केली जाते. स्वीकार किंवा व्यक्तिगत असू शकते आणि ज्याद्वारे वस्तूची एक दुसऱ्या सोबत तुलना केली जाते. स्वीकार आणि अस्वीकार केला जातो .एक-दुसऱ्याच्या तुलनेत उचित वा अनुचित ,चांगले ,वाईट अधिक अथवा कमी योग्य  मानले जाते."

**३) थॉमस आणि झेनेकी (Thomas and zeniky)**

"  सामाजिक मूल्य म्हणजे कुठले एखादे गुढत्व नसून ते मानवा द्वारे निर्मित असतात आणि मूल्याप्रती त्या विशिष्ट समाजातील सदस्य सचित किंवा जागरूक असतात."

मानवी मूल्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा परस्पर सहसंबंध - मानवाने बुद्धीच्या जोरावर क्रांतिकारी गोष्टी केली ती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता  विचार करणे, निर्णय घेणे ,समस्या सोडवणे आणि शिकणे या मानवी मानवी क्षमतांचे अनुकरण करणारी ही यंत्रणा आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. परंतु या तांत्रिक प्रगती सोबत एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी मूल्य यांचे नाते कसे असावे कारण तंत्रज्ञान मानवी कल्याणासाठी असते की

मानवी मूल्यांना  धक्का देण्यासाठी हे त्यांच्या वापरावर अवलंबून असते.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही मूल्य निरपेक्ष नसून ती मानवाच्या मूल्य प्रतिबिंबाचे साधन आहे जर यांच्या रचनेत आणि वापरात मानवी मूल्यांचा विचार केला नाही तर ती अन्याय भेदभाव अ मानवीकरण आणि शोषणाचे साधन ठरू शकते.

**निष्कर्ष -**

कृत्रिम बुद्धिमत्ता हे नव्या युगातील हे एक क्रांतिकारी साधन आहे. साहित्याच्या विस्तारासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुयोग्य वापर करता येतो. मानवी सर्जनशीलतेचा समन्वय साधल्यास व्यापक वाचक वर्ग निर्माण होईल व साहित्य कला संस्कृतीत निश्चितच चांगले दिवस येतील कमीत - कमी वेळेत श्रमात अधिक वेगवान माहिती मिळवता येते. नवलेखकांसाठी प्रेरणादायी बाब आहे. साहित्य संशोधनासाठी त्याचा उपयोग, वापर करता येतो. साहित्याची निर्मिती ही मानवी मेंदूतूनच निर्माण होते. हे कृत्रिम उपक्रम असल्यामुळे मानवी भावना संवेदना व विचारपासून ते दूर आहे . भविष्यकाळात या उपकरणाचा अधिक वापर झाल्यास मानवी मेंदूवर मर्यादा येऊन तो संकुचित बनण्याची भीती वाटते.  मूल्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा परस्पर संबंध असलेला आपल्याला पाहावयास मिळतो तंत्रज्ञान मानवी कल्याणाचे प्रभावी साधन ठरू शकते. विज्ञान आणि नैतिकता यांचा समन्वय साधला तरच खऱ्या अर्थाने मानव कल्याण साध्य होईल.

**संदर्भ सहाय्यक सूची.**

१) संत तुकाराम गाथा, महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

२) संत नामदेव गाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.

३) चॅटजिपीटी..

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)